वाचले :-१) अर्जदार श्री. केदार विरेंद्र शेर्लेकर, डायरेक्टर मेनलॅन्ड बिल्डर्स प्रा. लि, स्वतःकरीता व कु.मु. म्हणुन रा.२१३-२१५ प्लॅट नं. ४०१, कल्याणी नगर पुणे-४११०१४ यांचा सनद मिळणेकामी अर्ज दिनांक ०५/०५/२०१७

२) महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांनी त्यांचेकडील जा.क्र.DP/बीएचए/HAV/शाखा-१/मौ.वाघोली/ग.नं.८८७ पै. व इतर/प्र.क्र.१५८०/१६-१७ दि.१५/०३/२०१७

३) अर्जदार श्री. केदार विरेंद्र शेर्लेकर, डायरेक्टर मेनलॅन्ड बिल्डर्स प्रा. लि, रा.२१३-२१५ प्लॅट नं. ४०१, कल्याणी नगर पुणे-४११०१४ यांचा अकृषिक परवानगी मिळणेबाबतचा दि.३१/०३/२०१७ रोजीचा अर्ज

४) या कार्यालयाकडील पत्र क्र. PMRDA/NA/SR/३३/२०१७ दि.२९/०४/२०१७

५) या कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/एनए/एसआर/२७०/२०१४ दि.१०/०७/२०१४

६) या कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/एनए/एसआर/११५४/२०१४ दि.११/०३/२०१५

७) महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभागाकडील अधिसुचना दि.५/०१/२०१७

---

८) महाराष्ट्र जमिन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६९

महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे अंतर्गत आणि
महाराष्ट्र जमिन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६९
अनुसूची पाच
(नियम ७ पहा)

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
(महसूल शाखा)
क्र.PMRDA/NA/SR/३३/२०१७
पुणे- दिनांक:-१५/५ /२०१७

## सनद

२/- ज्याअर्थी, पुणे जिल्हयाच्या हवेली तालुक्यातील वाघोली, गावातील ग. नं. ८८७ पै., ग.नं. ८८८ पै. ग.नं.८८९ पै.ग. नं .८९० पै. मधील भोगवटादार अर्जदार श्री. केदार विरेंद्र शेर्लेकर, डायरेक्टर मेनलॅन्ड बिल्डर्स प्रा. लि, स्वतःकरीता व कुलमुखत्यार धारक म्हणुन रा.२१३-२१५ प्लॅट नं. ४०१, कल्याणी नगर पुणे-४११०१४ यांनी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीअन्वये परिशिष्ट एक मध्ये वर्णन केलेल्या आणि मोजणी नकाशावर दर्शविलेल्या ग. नं. ८८७ पै., ग.नं. ८८८ पै. ग.नं.८८९ पै.ग.नं.८९० पै. मधील रेखांकनात समाविष्ट केलेले १४३७५.८० चौ. मी क्षेत्रापैकी रस्त्याखालील १२७८.१९ चौ.मी. क्षेत्र वजा जाता उर्वरीत १३०९७.६१ चौ.मी. क्षेत्रापैकी पुर्व अकृषिक परवानगी दिलेले ७९२१.८१ चौ.मी क्षेत्र वजा जाता उर्वरीत ५१७५.८० चौ.मी क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ सनद मिळणेकामी या कार्यालयाकडे दिनांक ०५/०५/२०१७रोजी अर्ज केलेला आहे.

अर्जदार यांना या कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/एनए/एसआर/२७०/२०१४ दि.१०/०७/२०१४ अन्वये मौजे वाघोली ता. हवेली जि.पुणे येथील ग.नं. ८८७ पै.,८८८ पै,८८९ पै.,८९० पै, मधील एकुण क्षेत्र ९२००.०० चौ.मी. पैकी प्रादेशिक रस्त्याखालील क्षेत्र १२७८.१९ चौ.मी व सेवा रस्त्याखालील क्षेत्र ३.२१ चौ.मी क्षेत्र वजा जाता ७९१८.६० चौ.मी क्षेत्रावर निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १८ अन्वये बांधकाम नकाशांना मंजुरी देणेत आलेली आहे.

तदनंतर अर्जदार यांना या कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/एनए/एसआर/११५४/२०१४ दि.११/०३/२०१५ अन्वये मौजे वाघोली ता. हवेली जि.पुणे येथील ग.नं. ८८७ पै.,८८८ पै,८८९ पै.,८९० पै,

मधील एकुण क्षेत्र ९२००.०० चौ.मी. पैकी रस्त्याचे १२७९.१९ चौ.मी.क्षेत्र वजा करुन तसेच पुर्वी सेवा रस्त्याचे क्षेत्र ३.२१ चौ.मी वजा केलेले क्षेत्र पुन्हा नियोजनात समाविष्ट करुन त्यास निवासी प्रयोजनार्थ अकृषिक परवानगीसह एकुण ७९२१.८१ चौ.मी क्षेत्रास सुधारीत रेखांकन बांधकाम नकाशांना मंजुरी देणत आलेली आहे.

३/- ज्या अर्थी, अर्जदार श्री. केदार विरेंद्र शेर्लेकर, डायरेक्टर मेनलॅन्ड बिल्डर्स प्रा. लि, रा.२१३-२१५ प्लॅट नं. ४०१, कल्याणी नगर पुणे-४११०१४ यांनी या कार्यालयाकडील पत्र क्र.PMRDA/NA/SR/३३/२०१७ दिनांक २९/०४/२०१७ अन्वये ५१७५.८० चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ ०.१०/- प्रती चौ.मी. या दराने वार्षिक आकारणी र.रू. ५१८/- व रूपांतरीत कराची र.रू. २५९०/- , जिल्हा परिषद कर ३६२६/-, ग्रामपंचायत कर ५१८/- अशी एकूण र.रू. ७२५२/- एवढी रक्कम चलन GRN No.MH000952198201617I8M, दि.०४/०५/२०१७ व मोजणी फी रक्कम रुपये १६५००/- चलन GRN No. MH001052656201718M, दि.०५/०५/२०१७ अन्वये शासकीय कोषागारात भरलेली आहे व त्याची प्रत या कार्यालयास सादर केलेली आहे. व सनद मिळणेची विनंती केलेली आहे.

४/- त्या अर्थी, आता असे प्रमाणित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या उपबंधास अधिन राहून आणि खालील अटी व शर्तीवर मौजे वाघोली ता.हवेली, जि. पुणे येथील जमीन ग. नं. ८८७ पै., ग.नं. ८८८ पै. ग.नं.८८९ पै.ग.नं.८९० पै. मधील रेखांकनात समाविष्ट केलेले १४३७५.८० चौ. मी क्षेत्रापैकी रस्त्याखालील १२७८.१९ चौ.मी. क्षेत्र वजा जाता उर्वरीत १३०९७.६१ चौ.मी. क्षेत्रापैकी पुर्व अकृषिक परवानगी दिलेले ७९२१.८१ चौ.मी क्षेत्र वजा जाता उर्वरीत ५१७५.८० चौ.मी क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ वापरण्याची परवानगी देत आहे.

## परिशिष्ट एक

| अक्र | गावाचे नाव | तालुका | सर्व्हे/गट/सिटी सर्व्हे नं. | |
|---|---|---|---|---|
| १ | वाघोली | हवेली | ग. नं. ८८७ पै., ग.नं. ८८८ पै. ग.नं.८८९ पै.ग.नं.८९० पै. | |
| अक्र | जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. गट नं | ७/१२ नुसार एकुण क्षेत्र (चौ.मी) | बिनशेती करावयाचे क्षेत्र (चौ.मी) |
| १ | बापुसाहेब बबन हरगुडे<br>मोहन सर्जेराव बर्गे<br>मेनलॅन्ड बिल्डर्स प्रा. लि. तर्फे संचालक अशोक ताराचंद सामंत | ८८७ पै | ५७००.०० | ५७००.०० |
| २ | संदिप सुहासचंद सहोत्रा | ८८७ पै | १४००.०० | १४००.०० |
| ३ | बन्सीलाल तुकाराम भोसुरे | ८८७ पै. | ३२५.०० | ३२५.०० |
| ४ | बापुसाहेब बबन हरगुडे | ८८७ पै. | १००.०० | १००.०० |
| ५ | मेनलॅन्ड एल.एल.पी तर्फे भागीदार केदार विरेंद्र शेर्लेकर | ८८७ पै. | ४००.०० | ४००.०० |
| ६ | मेनलॅन्ड बिल्डर्स एल.एल.पी तर्फे भागीदार केदार विरेंद्र शेर्लेकर | ८८८ पै. | १७००.०० | १७००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | मेनलॅन्ड बिल्डर्स प्रा. लि. तर्फे संचालक अशोक ताराचंद सामंत | ८८८ पै. | १७००.०० | १७००.०० |
| ८ | मेनलॅन्ड बिल्डर्स प्रा. लि. तर्फे संचालक अशोक ताराचंद सामंत | ८८९ पै | ६००.०० | ६००.०० |
| ९ | संदिप सुहासचंद सहोत्रा डिपल संदिप सहोत्रा | ८८९ पै | ६००.०० | ६००.०० |
| १० | मेनलॅन्ड बिल्डर्स प्रा. लि. तर्फे संचालक केदार विरेंद्र शेर्लेकर | ८८९ पै | ३५०.०० | ३५०.०० |
| ११ | भाऊसाहेब जयसिंग आव्हाळे | ८८९ पै. | ३००.०० | ३००.०० |
| १२ | मेनलॅन्ड बिल्डर्स प्रा. लि. तर्फे संचालक अशोक ताराचंद सामंत | ८९० पै | १२००.०० | १२००.०० |
| १३ | एकूण क्षेत्र | | १४३७५.०० | १४३७५.०० |
| १४ | अर्जदार यांनी रेखांकन नकाशात समाविष्ट केलेले क्षेत्र | | | १४३७५.८० |
| १५ | रस्ता रुंदीखालील क्षेत्र | | | १२७८.१९ |
| १६ | (-) पुर्व अकृषिक परवानगी दिलेले क्षेत्र | | | ७९२१.८१ |
| १७ | निव्वळ अकृषिक परवानगी दयावयाचे क्षेत्र | | | ५१७५.८० |
| १८ | रेखांकनाचे प्रयोजन | | | **निवासी** |

## अटी व शर्ती

१. अर्जदार यांना ज्या प्रयोजनासाठी वापरात बदल करण्यास परवानगी दिलेली आहे त्या विशिष्ट अकृषिक प्रयोजनास योग्य होण्यासाठी आणि आरोग्यविषयक परिस्थितीस प्रतिबंध होण्यासाठी जमिन पुरेशी समतोल करणे व ती साफ करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

२. अर्जदार यांनी ५१७५.८० चौ.मी. क्षेत्राकरीता निवासी प्रयोजनार्थ ०.१०/- प्रती चौ.मी. या दराने अकृषिक सारा व त्यावरील उपकर गांव कामगार तलाठी यांचेकडे प्रती वर्षी जमा करणे बंधनकारक राहील. तसेच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार वेळोवेळी निश्चित होणाऱ्या दराने अकृषिक आकारणी करणेस अर्जदार पात्र ठरतील. दि.०१/०८/२००६ पासुन सुधारीत अकृषिक प्रमाणदर अमलात आलेनंतर फरकाची रक्कम असलेस ती शासनजमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३. प्रस्तुत जमीनीवर भविष्यात नजराणा रक्कम , अकृषिक साऱ्याची फरकाची रक्कम अशी काही शासकीय रकमेची बाकी उदभवल्यास सदर रक्कम शासनजमा करणे अर्जदारावर बंधनकारक राहील

४. अर्जदार यांनी ज्या प्रयोजनासाठी प्रस्तुतची सनद धारण केली आहे. त्याच प्रयोजनासाठी वापर करणे आवश्यक राहील. त्या व्यतिरिक्त असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी जमिनीचा वापर आणि त्यावर उभारलेल्या किंवा उभारावयाच्या इमारतीचा जिल्हाधिकाऱ्यांच्या पुर्व परवानगीशिवाय वापर करता येणार नाही.

५. सदरची सनद मिळालेल्या तारखेपासून अर्जदाराने ३ वर्षाच्या आत उक्त भूखंडावर भरीव कायमस्वरुपाचे निवासी बांधकाम सुरु केले पाहिजे. तसे न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मुदत वाढविण्यात आली नसेल तर देण्यात आलेली परवानगी व्यपगत झाल्याचे समजणेत येईल.

६. अर्जदार यांनी सादर केलेली माहिती व कागदपत्रांच्या सत्यतेबाबत संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील.

७. उपरोक्त अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

(सौरभ राव)
जिल्हाधिकारी पुणे

प्रत :- श्री. केदार विरेंद्र शेलेंकर, डायरेक्टर मेनलॅन्ड बिल्डर्स प्रा. लि,स्वत:करीता व कुलमुखत्यारधारक म्हणुन रा.२१३-२१५ प्लॅट नं. ४०१, कल्याणी नगर पुणे-४११०१४